# बृहन्मंबई महानगरपालिका

माहिम प्रसुतिगृह

एचओ/ 300 / एमएचएम दि. 22.07.2022

## जाहिर सुचना

वैदयकीय अधिकारी, माहिम प्रसुतिगृहाच्या अधिपत्याखाली येणारे दिलीप गुप्ते मार्ग, माहिम मुंबई-16 येथे 6 बहुउदेशीय कामगारांकरिता सामाजिक संस्थेचे स्वयंसेवक वापरुन कामे करण्यासाठीच्या बाबत सदर जाहिर सुचना देण्यात येत आहे.

येथे असे सुचित करण्यात येते कि, या कामासाठी इच्छूक संस्थांनी आपले लेखी अर्ज रु.1000/- अधिक 18% जी.एस.टी या किंमतीत प्राप्त करुन वैदयकीय अधिकारी, माहिम प्रसुतिगृह, दिलीप गुप्ते मार्ग, माहिम मुंबई-16 यांच्या कार्यालयात लवकरात लवकर पोहचतील अशी व्यवस्था करावी. केलेल्या कामाचे म.न.पा. च्या अटी व शर्ती नुसार योग्य ते वेतन देण्यात येईल. इच्छुक संस्थांनी याबाबतचा तपशील अर्ज व हमी पत्राचा नमुना प्राप्त करण्यासाठी वैदयकीय अधिकारी, महिम प्रसुतिगृह यांच्या कार्यालयात दि. 22.07.2022 ते 04.08.2022 या कालावधीत (सुट्टीच्या दिवसांव्यतिरिक्त) कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

इच्छूक संस्थेकडून महिम प्रसुतिगृह कार्यालयात अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख दि. 04.08.2022 दुपारी 4.00 वाजेपर्यंत असेल.

**अंतिम दिंनाक-04.08.2022**
**सोडत दिनांक -05.08.2022 रोजी दुपारी 12.00 वाजता**

सही/-
वैद्यकीय अधिकारी
माहिम प्रसुतिगृह

# परिशिष्ट – अ

## माहिम प्रसुतीगृहासाठी बहुउददेशीय कामगार या संवर्गातील कंत्राटी तत्वावर सामाजिक संस्थांद्वारे भरण्यासाठी येणारा खर्च

प्रति दिन प्रति कामगार रु. 698.07/-

| महिना | दिवस | कंत्राटी कामगारांची संख्या | खर्च (रु) |
|---|---|---|---|
| सप्टेंबर 2022 | 26 | 6 | 108899.00 |
| ऑक्टोबर 2022 | 26 | 6 | 108899.00 |
| नोव्हेंबर 2022 | 26 | 6 | 108899.00 |
| डिसेंबर 2022 | 26 | 6 | 108899.00 |
| जानेवारी 2022 | 26 | 6 | 108899.00 |
| फेब्रुवारी 2022 | 26 | 6 | 108899.00 |
| मार्च 2022 | 26 | 6 | 108899.00 |
| एकूण | 156 | | **6,53,394.00** |

कामाचे साहित्य

| परिक्षेत्र | माहिम प्रसुतिगृह |
|---|---|
| अर्जदार संस्थेने मनुष्यबळासोबत पुरवायची साधणे | 1. कामागारांसाठी गणवेश<br>2. ओळखपत्र<br>3. सुरक्षित साधने |

सही/-
वैद्यकीय अधिकारी
माहिम प्रसुतिगृह

## परिशिष्ट - ब

# बृहन्मुंबई महानगरपालिका

## माहिम प्रसूतिगृह

### अटी व शर्ती

- कंत्राटी कामगारांचा कालावधी सहा महिन्यांकरीता असेल. तदनंतर कंत्राटी कालावधी आपोआप संपुष्टात येईल.
- उपरोक्त कालावधीत नियमित तत्वावर पदे भरल्यास कंत्राटी कामगारांची सेवा संपुष्टात येईल.
- कंत्राटी कामगारांना प्रति दिन रु.698.07/-एवढे वेतन निश्चित केले आहे या व्यतिरिकत कोणताही भत्ता दिला जाणार नाही.
- यशस्वी संस्थेकडून अनामत रक्कम रु. 5000/- एवढी महानगरपालिकेच्या तिजोरीत भरणे आवश्यक आहे.
- इच्छुक संस्थांकडून लेखी अर्जाची किंमत रु. 1000/- अधिक 18% वस्तु व सेवा कर रोख स्वरुपात चलनाव्दारे महानगरपालिकेच्या तिजोरीत भरणे आवश्यक आहे.
- कंत्राटी कामगारांना वेळोवेळी वरिष्ठांनी सांगितल्याप्रमाणे प्रसुतीगृहात तिन्ही पाळयांमध्ये किंवा एकच पाळीमध्ये काम करावे लागेल.
- कंत्राटी कामगारांना सदर कालावधीत कोणतीही रजा अनुज्ञेय होणार नाही. तसेच कंत्राटी कामगार ज्या दिवशी गैरहजर असेल त्यादिवशीचे वेतन सदर कर्मचा-यास अनुज्ञेय होणार नाही.
- कंत्राटी कामगारांचे कामावरती कर्तव्य बजावण्यासाठी त्यांना वापरावयाची अंगवस्त्रे हे कंत्राटी संस्थेनेच पुरविणे आहे. तसेच कंत्राटी कामगारास कंत्राटदाराने त्याच्या नावाने ओळखपत्र देणे बंधनकारक राहील.
- कंत्राटी कालावधीत कंत्राटी कामगाराचे काम समाधानकारक न आढळल्यास त्यांची सेवा तात्काळ पूर्वसुचना न देता संपुष्टात करण्यात येईल.
- त्यांची नेमणूक करार पध्दतीची असल्याने त्यांना मनपा सेवेत सामावून घेण्याबाबत कोणत्याही न्यायालयात जाता येणार नाही अथवा दावा दाखल करता येणार नाही.
- कंत्राटी कामगारांच्या वेतनाची प्रकिया संस्थेकडून त्या त्या महिन्याचे देयक प्राप्त झाल्यानंतर त्याची प्रकिया सुरु केली जाईल.
- एखादा कंत्राटी कामगार कामावर न आल्यास त्वरीत त्याच्याजागी दुसरा कंत्राटी कामगार उपलब्ध करुन देणे हे कंत्राटदारास बंधनकारक राहील.
- कंत्राटदार व कंत्राटी कामगारांना (Regulation and Abolition) Act 1970 व The Industrial Employment (standing order) Act 1976 च्या तरतूदी लागू असतील. सदर कायद्यातील तरतूदीच्या अनुषंगाने सलग सेवा 240 दिवस पूर्ण होणार नाही याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

- बृहन्मुबई महानगरपालिका सेवानियमावली अटी व शर्तीखाली ही नेमणूक झाली नसल्यामुळे त्या अनुषंगाने मिळणारे निवृतीवेतन, भविष्य निर्वाह निधी अथवा तत्सम कोणत्याही प्रकारचे लाभ मिळण्यास कंत्राटी कामगार पात्र रहाणार नाहीत अथवा कंत्राटी पदावरील नियुक्तीच्या दिनांकापासून मिळणारे कोणत्याही प्रकारचे फायदे मिळणार नाहीत.
- संस्थेचा कामगार विहित वेळेवर कामावर हजर झाल्यास त्याला काम देण्यात येईल अन्यथा सहकारी संस्थेने त्याच्या जागेवर बदली कामगार उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील. अन्यथा संस्थेस प्रतिदिनी प्रति कामगार रु.150/- इतका दंड आकारण्यात येईल.
- कंत्राटी कामगारांचे वेतन हे पूर्णत स्वयंसेवी संस्थेमार्फत होणार असल्यामुळे त्यांच्या वेतनाची जबाबदारी ही त्या संस्थेची राहील. प्रत्येक महिन्याच्या 10 तारखेपर्यंत कामगारास वेतन अदा केले नाही तर रु. 1000/- इतका दंड आकारण्यात येईल्. सदर संस्थेने मासिक अधिदान कर्षित धनादेश/ ECS/RTGS/NEFT व्दारे करणे बंधनकारक राहील.
- परिपत्रक क्र. 03 दि.22.06.2021 अन्वये विधी व लेखन साहित्य आकार रु. 13190/- + 18% जीएसटी एवढी रक्कम भरणे आवश्यक आहे.

सही/-
वैद्यकीय अधिकारी
माहिम प्रसुतिगृह